# प्रेसनोट

जा.क्र.पोउआ/वाहतूक/ ६०८५ /२०१८,

पुणे शहर, दिनांक - २९/०६/२०१८

**विषय- संत श्री. तुकाराम महाराज व संत श्रेष्ठ श्री.ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थान सोहळा दरम्यान करण्यात येणारे वाहतूक डायर्व्हशन बाबत.**

-----------००----------

संत श्रेष्ठ श्री.तुकाराम महाराज व संत श्रेष्ठ श्री.ज्ञानेश्वर महाराज या दोन्ही पालख्या दिनांक ०७/०७/२०१८ रोजी पुणे शहरात दाखल झालेल्या असून, दिनांक ०९/०७/२०१८ रोजी संत श्री.तुकाराम महाराज यांची पालखी श्री.निवडुंगा विठ्ठल मंदीर, नानापेठ, पुणे येथून सोलापूर रोड मार्गे पंढरपूरकडे प्रयाण करणार आहे. तसेच संत श्रेष्ठ श्री.ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी पालखी विठोबा मंदीर, भवानीपेठ, पुणे सासवड रोडमार्गे पंढरपूरकडे प्रयाण करणार आहे. सबब शहरातील वाहतूक सुरळीत व सुरक्षित इष्ट आहे, त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन सदर परिसरातील वाहतूक **आवश्यकतेनुसार** तात्पुरती खालील प्रमाणे बंद व वळविण्यात येणार आहे. त्याबाबत आदेश निर्गमित करीत आहे.

***संत श्री.तुकाराम महाराज व संत श्रेष्ठ श्री.ज्ञानेश्वर महाराज पालख्यांचे प्रस्थानाचा मार्ग***

दिनांक **०९/०७/२०१८** रोजी **संत श्रेष्ठ श्री.तुकाराम महाराज यांची पालखी** निवडुंगा विठोबा मंदीर येथून निघून अरुणा चौक, समाधान चौक, पिंपरी चौक, ए.डी कॅम्प चौक, रामोशीगेट चौकी चौक, भवानी माता मंदीर, मुक्ती फौज चौक, पुलगेट चौकी चौक, मम्मादेवी चौक, सोलापूर रोडने हडपसर गाडीतळ येथून सरळ सोलापूर रोडने लोणी-काळभोर मार्गे पंढरपूरकडे प्रयाण करेल.

तसेच **संत श्रेष्ठ श्री.ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी** पालखी विठोबा मंदीर, भवानीपेठ, येथून रामोशीगेट चौकी चौक, भवानी माता मंदीर, मुक्ती फौज चौक, पुलगेट चौकी चौक, मम्मादेवी चौक, सोलापूर रोडने हडपसर गाडीतळ येथून उजवीकडे वळून सरळ सासवड मार्गे पंढरपूरकडे प्रयाण करेल.

- **दिनांक ०९/०७/२०१८ रोजी संत श्री.तुकाराम महाराज यांची पालखी निवडुंगा विठोबा मंदीर, नानापेठ येथून हडपसर मार्गे पंढरपुरकडे प्रस्थान करणार असुन संत श्रेष्ठ श्री.ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी, पालखी विठोबा मंदीर, भवानीपेठ येथून सासवड मार्गे पंढरपुरकडे प्रस्थान करणार आहे. त्यामुळे खालील नमूद रस्ते पहाटे ०५.०० ते पालखी पुणे हद्दी बाहेर जाईपर्यत पालखी व वारकरी असलेल्या मार्गावरील वाहतूक टप्प्या-टप्प्याने बंद करण्यात येणार असून वाहनचालकांनी या मार्गावर न येता दिले पर्यायी मार्गाचा वापर करावा :-**

| अ.नं. | वाहतूकीसाठी बंद रस्ते | पर्यायी मार्ग |
|---|---|---|
| १. | संत कबीर चौक - बेलबाग चौक | संत कबीर चौक - रास्ता पेठ पॉवर हाऊस- जिजामाता चौक - बेलबाग चौक |
| २. | संत कबीर चौक - रामोशी गेट चौक | पॉवर हाऊस - फडके हौद- देवजीबाबा चौक - हमजेखान चौक |
| ३. | सेव्हन लव्ह चौक - रामोशी गेट चौक | सेव्हन लव्ह चौक- जेधे चौक |
| ४. | गोळीबार मैदान - सेव्हन लव्ह चौक | गोळाबार मैदान - सी.डी.ए. चौक - सॅलीसबरी पार्क / लुल्ला नगर चौक-गंगाधाम चौक |
| ५. | मम्मादेवी चौक - गोळीबार मैदान | वानवडी बाजार चौक - लुल्लानगर चौक – गंगाधाम चौक |
| ६. | बिशप स्कुल - मम्मादेवी चौक | बिशप स्कुल – पाण्याची टाकी - काहुन रोड - मोरओढा ब्रीज - घोरपडी |
| ७. | वानवडी बाजार ते मम्मादेवी चौक | वानवडी बाजार चौक – शिंदे छत्री- जगताप चौक - रामटेकडी -ससाणेनगर |
| ८. | ट्रायलक चौक एम.जी रोड - रामोशी गेट चौक | एम.जी. रोड ते डॉ. आंबेडकर पुतळा चौक - बॅनर्जी चौक |
| ९. | मोरओढा चौक - भैरोबानाला चौक | १. सोलापूर बाजुला जाण्यासाठी- घोरपडी गांव - रेल्वे गेट- केशवनगर चौक मार्गे किंवा<br>२. कोरगांव पार्क जंक्शन-नॉर्थ मेन रोड - एबीसी फार्म चौक- केशवनगरमार्गे |
| १०. | भैरोबानाला - मम्मादेवी चौक | १. भैरोबानाला - वानवडी बाजार चौक - लुल्ला नगर चौक<br>२. भैरोबानाला-एम्प्रेस गार्डन रोड - मोरओढा |

| | | |
|---|---|---|
| ११. | जांभुळकर चौक - फातीमा नगर चौक | जांभुळकर चौक-जगताप चौक |
| १२. | बी.टी.कवडे जंक्शन,काळुबाई जंक्शन, रामटेकडी जंक्शन, वैदुवाडी जंक्शन, जुना कॅनॉल रोड जंक्शन,मगरपट्टा(मुंढवा)जंक्शन,हडपसर वेस जं. | सदर वेळी अंतर्गत रस्त्यांचा वापर सुरू ठेवण्यात येणार आहे. |
| १३. | सिरम फाटा जंक्शन ते सोलापूर रोड<br>१५ नंबर फाटा ते सोलापूर रोड | पालखी व दिंडया पास होताना तात्पुरत्या स्वरूपामध्ये बंद ठेवून प्रसंगानुरूप सोलापूर रोडला प्रवेश देण्यात येईल. |
| १४. | मंतरवाडी फाटा ते दिवेघाट | पालखी दिवे घाट पास होईपर्यंत कोणतेही वाहन दिवेघाटाकडे न सोडता मंतरवाडी फाटा-खडी मशिन चौक - बोपदेव घाट - सासवड मार्गे वळविण्यात येईल. |
| | **जड वाहतूक सोलापूर रोडने पुण्याकडे येण्यास बंद** | |
| १५. | थेऊर फाटा ते पुणे | थेऊर फाटा- केसनंद - वाघोली - अहमदनगर रोड |
| १६. | मंतरवाडी फाटा ते हडपसर गाडीतळ | सासवड - दिवेघाट- मंतरवाडी फाटा - उंड्री पिसोळी-खडी मशिन चौक - लुल्ला नगर - मार्केट यार्ड / खडी मशिन ते कात्रज |
| १७. | खराडी बायपास ते मगरपट्टा मार्गे सोलापूर रोड | १. सासवड - बोपदेव घाट-खडी मशिन चौक किंवा<br>२. खराडी बायपास - अहमदनगर रोड- केसनंद-थेऊरफाटा |
| १८. | जड वाहनांकरीता मालधक्का ते पॉवर हाऊस चौक बंद | मालधक्का- शाहिर अमर शेख चौक- कुंभार वेस चौक- गाडगीळ पुतळा- शिवाजी रोड ने पुढे |

तसेच दिनांक ०९/०७/२०१८ रोजी शहरात जड वाहने येऊन वाहतूक समस्या निर्माण होऊ नये म्हणून सोलापूर, सासवड व अहमदनगरकडून मुंबई कडे जाणा-या व येणा-या सर्व प्रकारचे जड वाहनांचे वाहन चालकांनी खालील नमूद पर्यायी मार्गांचा वापर करुन होणारी संभाव्य गैरसोय टाळून पोलीसांना सहकार्य करावे.

**१. सोलापूर कडून नगर/नाशिक/मुंबई कडे जाणा-या व येणा-या वाहनांकरीता खालील मार्गांचा वापर करावा.**

**३. चौफुला - केडगाव - पारगाव - न्हावरे फाटा - नगर रोड - शिक्रापूर - चाकण - तळेगाव.**

**४. थेऊर फाटा - केसनंद - वाघोली / लोणीकंद - नगररोड - मरकळ - मोशी.**

**२. सासवड कडून मुंबई नाशिक - नगरकडे जाणारे व येणारे वाहनांनी खालील मार्गांचा वापर करावा.**

**४. सासवड - नारायणपूर -कापूरहोळ - कात्रज बायपास.**

**५. सासवड - बोपदेव घाट - कात्रज बायपास.**

**३. मुंबईकडून येवून अहमदनगरकडे जावू इच्छिणारे वाहन चालकांनी तळेगांव येथून चाकण, शिक्रापूर यामार्गे अहमदनगरकडे** जावे.

➢ इतर निर्बंध :-

(१) पालख्यांच्या मार्गावरील वारकऱ्यांची व भाविकांची गैरसोय होवू नये या उद्देशाने व सुरक्षिततेच्या दृष्टीने या प्रस्थान मार्गाचे दोन्ही बाजूस तसेच त्यास छेदणारे इतर उप-रस्त्यांवर आतील भागात १०० मी. पर्यंत सर्व प्रकारची वाहने उभी करण्यास तात्पुरता प्रतिबंध करण्यात येत आहे.

(२) पालख्यांचे प्रस्थान मार्गावरील पालखी पुढे जाऊन मागील रस्ता जस-जसा वाहतूकीस योग्य होईल त्याप्रमाणे मागील रस्त्यावरील वाहतूक टप्प्या-टप्प्याने पुर्ववत करण्यात येईल.

(३) संत श्री.ज्ञानेश्वर महाराज व संत श्री.तुकाराम महाराज पालख्यांचा सोहळा पुणे पोलीस आयुक्तालयात सुरक्षित व्हावा व वाहतूकीची कोंडी होवू नये यासाठी सर्व नागरीकांनी वाहतूक व्यवस्थेतील बदल अंमलात आणून तसेच पोलीसांनी त्या-त्यावेळी दिलेल्या सूचनांचे त्वरीत पालन करून सहकार्य करावे.

**श्री.संत ज्ञानेश्वर महाराज पालखीच्या दिंडयांसोबत येणाऱ्या वाहनांनी पुण्याकडून - सासवडकडे जाणाऱ्या वाहनांनी १. भैरोबानाला चौक - लुल्लानगर चौक - कोंढवा खडीमशीन चौक - बोपदेव घाट मार्गे सासवड किंवा २. मंतरवाडी फाटा - फुरसुंगी मार्गे ऊंड्री-पिसोळी - खडी मशीन चौक मार्गे बोपदेव घाटाकडून सासवड या मार्गाचा वापर करावा पर्यायी मार्गांचा वापर करावा.**

या संबंधी अधिक माहिती हवी असल्यास वाहतूक मुख्य नियंत्रण कक्ष, दुरध्वनी क्रमांक २६१२२००० / २६२०८२२५ वर संपर्क साधवा.